**महाराष्ट्र शासन,**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, चंद्रपुर,**
**सिव्हील लाईन्स्, चंद्रपूर ४४२४०१**
¨E-mail Address:-chandrapur1.ee@mahapwd.com

## सरळ सेवा भरतीसाठी जाहिरात

**जाहिरात क्रमांक ७२०३ /का.१(४)/ससेभ/२०१२.** **दिनांक ::- १४-१२-२०१२**

सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर अंतर्गत चंद्रपुर जिल्ह्यातील शिपाई व चौकीदार (गट-ड) संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवा भरतीने सामाजिक आरक्षण अंतर्गत समांतर आरक्षणाने भरावयाची आहे. त्यासाठी पात्र उमेदवाराकडून सोबत विहित नमूण्यातील अर्ज खालील नमूद केलेल्या ठिकाणी टपालाने (पोस्टाव्दारे) **दिनांक ०७-०१-२०१३** पर्यंत **सांयकाळी ५.३०** वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावे. अर्ज कार्यालयात परस्पर स्विकारले जाणार नाही. **दिनांक ०७-०१-२०१३ सांयकाळी ५.३०** वाजेनंतर टपालाने वा कोणत्याही मार्गाने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

## रिक्त पदाचा तपशिल

| अ. क्र. | पदनाम व गट | रिक्त पदे | वेतन बँड | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माजी सैनिक | महिला | खेळाडु | अपंग | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | सर्व-साधारण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | शिपाई | ३ | १-एस ४४४०-७४४०/- ग्रेड वेतन १३००/- | **अनु.जमाती** | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | | | **खुला प्रवर्ग** | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | | **एकूण ::-** | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| २ | चौकीदार | ८ | १-एस ४४४०-७४४०/- ग्रेड वेतन १३००/- | **अनु.जमाती** | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | | **वि.जा.अ.** | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | **भ.ज.क.** | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | **खुला प्रवर्ग** | २ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| | | | | **एकूण ::-** | २ | ४ | ० | ० | ० | ० | २ | ८ |

| **अ.क्र.** | **पदनाम व गट** | **किमान शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|
| १ | शिपाई | किमान इयत्ता ४थी परिक्षा उत्तीर्ण |
| २ | चौकीदार | किमान इयत्ता ४थी परिक्षा उत्तीर्ण |

### वयोमर्यादा दिनांक १३-१२-२०१२ रोजी

१) खुल्या प्रवर्गासाठी - १८ ते ३३ वर्ष
२) मागासवर्गीयांसाठी - १८ ते ३८ वर्ष
३) माजी सैनिक - १८ ते ४५ वर्ष

### सर्वसाधारण अटी :-

१) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. सोबत रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे.

२) सदर पदे चंद्रपूर जिल्हयाकरीता भरावयाची आहे. त्यामुळे उमेदवाराची निवड झाल्यानंतर नियुक्ती केलेल्या ठिकाणी रूजू व्हावे लागेल. व शासन नियमाचे अधीन राहून तेथे सेवेचा कालावधी पूर्ण करावा लागेल.

३) या पदासाठी ए-४ आकाराच्या चांगल्या दर्जाचा पांढ-या कागदावर टंकलीखीत/छापलेल्या **सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज करावा**. अर्ज सादर करतांना सामाजिक तसेच समांतर आरक्षणाअंतर्गत ज्या प्रवर्गातील पदासाठी अर्ज करावयाचा आहे. तो स्पष्ट अर्जाच्या सुरवातीस नमूद करावे.

४) अर्जदाराने अर्जासोबत परिक्षा शुल्क (फी) न्यायालयीन मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प), कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.१, चंद्रपूर यांचे नांवे असलेला राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डिडी.), भारतीय पोस्टल आर्डर यापैकी कोणत्याही एका स्वरूपात जोडणे आवश्यक राहील. डी.डी.च्या मागील बाजुस पदाचे नांव स्वत:चे नांव व पत्ता नमुद करावा.

**१. खुला प्रवर्गातील उमेदवारासाठी (लेखी परिक्षा व मुलाखत) :: रू. २००/-**
**२. राखीव प्रवर्गातील उमदेवारासाठी (लेखी परिक्षा व मुलाखत) :: रू. १००/-**
**३. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही. त्यांनी माजी सैनिक असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासह जोडणे आवश्यक आहे.**
**परिक्षा शुल्क हा ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.**

५) अर्जासोबत स्वतःचे नांव व अचूक पत्ता असलेला रू.५/- चा पोस्टेज स्टॅम्प चिकटवून २३ **X** १२ से.मी. आकाराचा लिफापा जोडावा.अर्जावर व ओळखपत्रावर अलीकडच्या काळातील स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो राजपत्रीत अधिकाऱ्याकडुन साक्षांकीत करून नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. अर्ज पाठवितांना बाहेरील लिफाप्यावर शिपाई/चौकीदार यापैकी ज्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे. त्या पदाचे नांव समातर आरक्षणासह स्पष्ट पणे लिहावे. (उदा. "शिपाई/अनु.जमाती/महिला प्रवर्ग " पदासाठी अर्ज).

६) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे वा रद्द करणे, अंशतः बदल करणे, आदिबाबतचे सर्व अधिकार निवड समितीने राखून ठेवेलेले आहे याबाबत कोणालाही कोणताही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

७) नियुक्ती झालेल्या उमेदवारांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमाक अनियो/१००५/१२६/सेवा.४, दिनांक ३१.१०.२००५ च्या परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या तरतूदी लागू राहतील.

८) शैक्षणिक तसेच इतर अर्हतेबाबत आवश्यक त्या सर्व कागदपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती, महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र, जन्म तारखेचा दाखला तसेच इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, (उपलब्ध असल्यास जाती वैधताबाबतचे प्रमाणपत्र) इत्यादी तसेच वि.जा.अ, भ.ज.क उमेदवारांनी नॉन क्रिमीलिएरअसल्याबाबतचे सध्या वैध असलेले प्रमाणपत्राची इत्यादी सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी. वरील पदाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडलेली नसल्यास अर्ज रद्द समजण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतल्या जाणार नाही.

९) उमेदवारांना परीक्षेस/ मुलाखतीस येण्या-जाण्याचा प्रवास खर्च दिल्या जाणार नाही.

१०) अनुसुचीत जमाती वगळून विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती (क) व महिला आरक्षणाचा लाभ घेणा-या महिला यांना क्रिमीलिएर तत्व लागु करण्यात आल्याने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दिनांक ३१-०३-२०१३ पर्यंत वैध ( Valid ) मुदतीचे नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११) शिपाई/चौकीदार या पदाची परीक्षा त्या पदाच्या शैक्षणिक अर्हतेच्या आधारीत ज्ञानावर राहील. शिपाई/चौकीदार या पदाकरीता उमेदवाराची निवड लेखी परीक्षा व मुलाखत यात मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येईल. पदाची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता समान गुण धारण करणा-या उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णयात दिलेल्या सुचनाच्या अधिन राहून निवड केल्या जाईल. याबाबतचे सर्व अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

१२) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे अपुर्ण सादर केल्यास / अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्ती झाल्यानंतर सुध्दा उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१३) माजी सैनिक, सेवायोजन कार्यालयाकडुन नोंदणीकृत झालेले उमेदवार व इतर संबधीत कार्यालयात नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालयाकडे/एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे नोंदविले असेल तरी त्यांनी वरील पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

१४) या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदावर उमेदवाराची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधीन असेल.

१५) शिपाई/चौकीदार पदाकरीता उमेदवाराची लेखी परिक्षा ७५ गुणाची वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) असेल. लेखी परिक्षेचा दर्जा इयत्ता ४थी परिक्षेचा असेल. लेखी परिक्षेतील प्राप्त गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय निवड यादी तयार करण्यात येईल. या पदाकरीता किमान गुणाची अट नाही. लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांना मुलाखतीला बोलविण्यात येईल. मुलाखतीसाठी २५ गुण राहील. उमेदवारांची अंतिम निवड लेखी व मुलाखतीत मिळालेल्या एकुण गुणाच्या आधारावर केली जाईल.

१६) उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या महिला प्रवर्गाच्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा विचार केल्या जाईल.

१७) उमेदवारांनी अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१८) महिलासाठी व समांतर आरक्षण हे शासनाच्या प्रचलित नियमानुसार राहील.

१९) समांतर आरक्षणाची पदे एकुण अनुशेषाचे पदांतर्गत समाविष्ठ आहे.

२०) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्या जाणार नाही.

२१) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे व जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास सोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासनाचे प्रचलीत नियमानुसार नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक राहील. (शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२००९ व दिनांक २६.०३.२०१०) व तसेच नियुक्ती चारित्र्य पडताळणी अहवाल व वैद्यकिय तपासणी अहवालाच्या अधिन राहील.

२२) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. तसेच भरती प्रकिये दरम्यान निवड समिती यांच्याकडे राजकिय दबाब आणल्यास संबंधीत उमेदवाराला अपात्र ठरविण्यात येईल.

२३) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/१७/२०००/१२ दिनांक १.७.२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. (अविवाहीत उमेदवारांनीसुध्दा लागु नाही असे नमुद करून सदर प्रतिज्ञापत्र स्वाक्षरी करून सादर करणे आवश्यक आहे.)

२४) अर्जाच्या छाननी नंतर पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेकरीता ओळखपत्र त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पत्यानुसार टपालाने पाठविण्यात येईल व लेखी परिक्षेस उपस्थित राहतांना ते ओळखपत्र जवळ बाळगाणे अनिवार्य राहील. त्याशिवाय परिक्षेस प्रवेश दिल्या जाणार नाही. तसेच टपाल खात्याचे विलंबामुळे ओळखपत्र मिळण्यास उशिर झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. छाननी अंती पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी प्रवेश दिल्या जाईल.

२५) विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले अर्ज, मजकुर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, आवश्यक त्या ठिकाणी स्वाक्षरी नसलेले अर्ज, आवश्यक शैक्षणीक अर्हतेच्या साक्षांकीत प्रती न जोडलेले अर्ज, अधिवास प्रमाणपत्र व लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नसलेले अर्ज, मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र नसलेले अर्ज, विहित शुल्क न भरलेले व फोटो नसलेले अर्ज, अपुर्ण अर्ज, विहित कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज या प्रमाणे उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील.

२६) **अर्ज सादर करण्याचा व पत्र व्यवहाराचा पत्ता** – कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग क्र.१, संजय गांधी मार्केट समोर, सिव्हील लाईन, चंद्रपूर पीन कोड ४४२ ४०१ असा राहील.

२७) छाननी नंतर पात्र असलेल्या उमेदवाराची नांवे तसेच लेखी परिक्षेत पात्र ठरून मुलाखतीकरीता निवड झालेल्या उमेदवाराची यादी परिक्षा झाल्यानंतर या कार्यालयाचे www.mahapwd.com या संकेत स्थळावर दर्शविण्यात येईल. तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, चंद्रपूर कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. भरती प्रक्रियेसंबंधी देण्यात येणा-या सुधारित व अद्यावत सुचना फलकावर/सांकेतीक स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२८) या जाहिराती मध्ये कोणतेही फेर बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राहील.

२९) सदर जाहिरात www.mahapwd.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

## निवड प्रकिया कार्यक्रम

| अ.क्र. | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | अर्ज स्वीकारण्याचा दिनांक | **दिनांक २४-१२-२०१२ ते ०७-०१-२०१३ सायंकाळी ५.३० पर्यंत.** |
| २. | लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | **दिनांक १५-०१-२०१३** |
| ३. | अपात्र ठरलेल्या अर्जाबाबत आक्षेप सादर करण्याची संधी | **दिनांक १७-०१-२०१३ दुपारी ३.०० वाजेपर्यत** |
| ४. | लेखी परिक्षेसाठी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे | **दिनांक १८-०१-२०१३** |
| ५. | लेखी परिक्षा दिनांक व वेळ | **दिनांक ०३-०२-२०१३ वेळ ११.०० ते १२.३० वाजेपर्यंत** |
| ६. | लेखी परिक्षेचा निकाल प्रसिध्द करणे | **दिनांक ०५-०२-२०१३** |
| ७. | मुलाखतीचा दिनांक व वेळ | **दिनांक १२-०२-२०१३ वेळ ११.०० वाजेपासून** |
| ८. | अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे | **दिनांक १३-०२-२०१३** |

सदरच्या कार्यक्रमामध्ये बदल अथवा रद्य करण्याचे अधिकार निवड समितीने राखून ठेवेलेले आहे.

**अध्यक्ष निवड समिती**
**तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,**
**चंद्रपूर**

**अर्जाचा नोंदणी क्रमांक**

# <u>अर्जाचा नमुना</u>

**------------------- या पदाकरिता ------------ प्रवर्गातून नियुक्ती मिळण्याकरिता आवेदन पत्र**

**उमेदवाराचे राजपत्रित अधिका-याने साक्षांकित केलेले पासपोर्ट आकाराचे अद्यावत छायांकित**

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,
सिव्हील लाईन्स,
चंद्रपूर-४४२४०१

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नांव | ........................................<br>(आडनांव) (स्वत:चे नांव)(वडिलाचे /पतीचे नांव) |
| २. | कायमचा पत्ता | |
| ३. | पत्रव्यवहाराचा सद्याचा संपूर्ण पत्ता (पिनकोड)(दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकासह) | |
| ४. | जन्म दिनांक (शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार) | |
| ५. | दिनांक १३-१२-२०१२ रोजीचे वय. | ----------- वर्ष -------- महिना ------- दिवस |
| ६. | जात व जातीचा प्रवर्ग | |
| ७. | ज्या आरक्षणातंर्गत नियुक्ती पाहिजे आहे तो प्रवर्ग (सामाजिक तसेच समांतर आरक्षण स्पष्ट नमूद करावे) | |
| ८. | लिंग ( स्त्री / पुरुष) | |
| ९. | विवाहीत / अविवाहीत (विवाहीत असल्यास लहान कुटुंब असल्याचे नमुना-अ मधील प्रमाणपत्र आवश्यक आहे) | |
| १०. | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय ? | होय / नाही |
| ११. | उमेदवार उन्नत-प्रगत (क्रिमीलिअर) गटात मोडत आहे काय? ( उन्नत व प्रगत गटात नसल्यास सध्या वैध असलेले सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र जोडावे) | होय / नाही |

| १२. | **शैक्षणिक अर्हता** | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | परिक्षेचे नांव | शाळेचे/बोर्डाचे/ विद्यापीठाचे संस्थेचे नांव | मिळालेले गुण (टक्के) | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १३. | सेवायोजन कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय/ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/एकात्मीक आदिवासी कार्यालय येथे नोंदणी केली आहे काय? असल्यास कार्यालयाचे नांव, नोंदणी क्रमांक नमुद करावा. | होय /नाही<br>कार्यालयाचे नांव ::<br>नोंदणी क्रमांक :: |
| १४. | अ) उमेदवार माजी सैनिक आहे काय? | होय / नाही |
| | ब) उमेदवार लष्करी कार्यवाहीत मृत्यु पावलेल्या कुटुंबापैकी आहे काय? | होय / नाही |
| १५. | **अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रांच्या साक्षांकित प्रत जोडल्या आहेत काय ?** | |
| | १) किमान इयत्ता ४थी परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका | होय /नाही |
| | २) शाळा सोडल्याचा दाखला (जन्म तारखेच्या दाखल्यासाठी) | होय / नाही |
| | ३) जातीचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| | ४) जातीचे वैधता प्रमाणपत्र जोडले आहे काय ? (वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर ३ महिण्यात सादर करणे बंधनकारक राहील) | होय / नाही |
| | ५) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्यास दाखला (Domicile Certificate) | होय / नाही |
| | ६) सेवायोजन /रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/ एकात्मीक आदिवासी कार्यालयाचे पंजीयन कार्ड. | होय / नाही |
| | ७) विवहित /विवाहिता असल्यास लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ( नमुना अ नुसार) | होय / नाही |
| | ८) माजी सैनिकास जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नाव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| | ९) उन्नत आणि प्रगत व्यक्ति व गट यामध्ये मोडत नसल्या बाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र. | होय / नाही |

मी प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो कि, वरील माहिती सत्य आणि बरोबर आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काही तक्रार राहणार नाही. नियुक्तीनंतर वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-१००५/१२६/सेवा.४, दिनांक ३१.१०.२००५ च्या परिभाषित अंशदान योजनेच्या तरतुदी मला मान्य राहतील. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र एप्रील २८, २००५ (वैशाख ८, शके १९२७) मध्ये नमूद केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

**दिनांक ::** **अर्जदाराचे संपूर्ण नांव व सही**

भाग-४-अ महाराष्ट्र शासन राजपत्र, एप्रिल २८, २००५/वैशाख ८, शके १९२७

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना – "अ"**

**(नियम ४ पहा)**

मी, श्री./श्रीमती/कुमारी ---------------------------------------------------------------

श्री. ----------------------------------------------------- यांचा मुलगा/ मुलगी /पत्नी वय ---------- वर्ष,

राहणार ---------------------------------------------------------------------------------------------

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते कि,

(१) मी -------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ---------------------------- (संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दिनांक ------------- यानंतर जन्माला मुलांची संख्या --------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/३/२००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

**दिनांक ::**

**ठिकाण ::** **अर्जदाराचे नाव व सही**

**शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ/२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५ मे, २००१ चे परिशिष्ट**

## परिशिष्ट – दोन

खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थेमध्ये ठेवण्यात आलेल्या ३० टक्के आरक्षण सवलतीकरीता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना

## -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. संकीर्ण २०००/प्र.क्र.४१५/का-२/दि. २२ मे, २००१ अन्वये विहित केलेल्या खुल्या प्रवर्गातील महिलांकरीताच्या उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) प्रवर्गामध्ये -

कुमारी/श्रीमती ------------------------------------------------------------------ यांच्या कुटुंबीयांचे लगतच्या मागील ३ वर्षाचे सर्व मार्गानी मिळुन एकुण उत्पन्न वार्षिक सरासरी रूपये २ लाखच्या आत असल्याने त्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाहीत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-** **सक्षम प्राधिकाऱ्याची सही**

## ............................... या पदाचे परिक्षेकरीता उमेदवाराचे ओळखपत्र

## (उमेदवाराने भरावयाची माहिती)

उमेदवाराचे राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकित केलेले पासपोर्ट आकाराचे अद्यावत छायाचित्र

उमेदवाराचे संपुर्ण नांव :- ...............................................................

उमेदवाराचा संपुर्ण पत्ता :- ..............................................................

..............................................................

..............................................................

आरक्षणाचा प्रकार :- ...............................................................

**उमेदवाराचे नाव व सही**

## (कार्यालयाने भरावयाची माहिती)

अर्जाचा नोंदणी क्र. :- ..................................................................

परिक्षा दिनांक :- ..................................................................

परिक्षा स्थळ केंद्र :- ..................................................................

बैठक क्रमांक :- ...................................................................

**प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**

**ई-मेलद्वारे**

कार्यालय कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. १, चंद्रपूर
दुरध्वनी क्रमांक ०७१७२-२५०२४५
Email Address :- chandrapur1.ee@mahapwd.com

जा.क्र. :: **७३६३** / का.१ (४)/ दिनांक **२०-१२-२०१२**

प्रति,

मुख्य अभियंता,
सा. बां. प्रादेशिक विभाग,
''बांधकाम संकुल'' सिव्हील लाईन्स,
नागपूर.

विषय :: वर्गीकृत जाहिरात सार्वजनिक बांधकाम विभागाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.

विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील शिपाई व चौकीदार (गट-ड) संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवा भरतीने भरावयाची असल्याने त्याची जाहिरात E-mail www.mahapwd.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

माहिती व जाहिरात प्रसिध्दी करीता सविनय सादर.

**सहपत्र** :: जाहिरात

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १,**
**चंद्रपूर.**

**प्रतिलिपी** :: अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.